म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणें.
विषय प्रा. वाङ्मय
दा. क्र. १३२५५

IRBK-0113255
IRBK-0113255

19 APR

MAY 1978

3 MAY 1978

DEC 1978

7 DEC 1978

IRBK-0113255



दा. क्र. 93255

13 JUN 1975

# टिल्लू
# नावाचा विदूषक

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. वाचनालय शाखा
अनुक्रम ५२५५७ वि. का. ८५
क्रमांक ३९७५ नोंद दि. २/१/७५

मूळ जर्मन कथा

**एरिख् कास्टनर**

म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय शाखा.
दा. क्र. 93254 नों. दि ..........
वि. का ८५ क्र. ..........

मराठी अनुवाद

**भा. रा. भागवत**

मैना प्रेस : मुंबई

जर्मन लायब्ररी

मराठी अनुवाद @ मैना प्रेस मुंबई १ १९७०

चित्रे : वॉल्टर ट्रायर

मुद्रक : दत्तात्रय विश्वनाथ पाठक जगदीश्वर प्रेस गायवाडी मुंबई ४
मुखपृष्ठ व चित्र छपाई : आय. बी. एच. प्रिंटर्स मुंबई २७
प्रकाशक : मोहन पंजाबी मैना प्रेस निकल रोड मुंबई १

# अनुक्रमणिका


| | |
|---|---|
| हा टिल्लू कोण ? | ७ |
| टिल्लूचं तिहेरी बारसं | ९ |
| टिल्लू दोरीवरून चालतो | १२ |
| मधाच्या मोहळात टिल्लू | २१ |
| टिल्लू रोगी बरे करतो | २७ |
| घुबडं नी मांजरं भाजणारा टिल्लू | ३३ |
| टिल्लू पहारेकरी बनतो. | ३९ |
| टिल्लू जमीन घेतो | ४३ |
| गाढवाचा गुरू टिल्लू | ४७ |
| टिल्लूचं शिंप्यांपुढं व्याख्यान | ५३ |
| शिंपी उडले शिवता शिवता | ५६ |
| फरवाल्यांची फे फे | ६० |
| ब्रेमन शहरात दूधच दूध | ६५ |

# हा टिल्लू कोण ?

मत्प्रिय छोटे सज्जन हो !

तुम्ही सर्वांनीच सर्कस पाहिली असेल असं नाही. पण विदूषक म्हणजे काय चीज असते हे मात्र–मला वाटतं–तुम्हाला सर्वांना माहीत असेल. अंगावर भडक नि भोंगळ कपडे घालून आणि तोंडाला रंग फासून सर्कशीत वावरणारे मजेशीर लोक म्हणजे विदूषक. कधी कधी ते रिंगणात घोड्यामागून धावतात; 'हिक' करून घोड्याच्या पाठीवर कुदतात. पण त्यांची उडी हमखास चुकते आणि ते जमिनीवर पडतात. रिंगणात भुस्सा पसरलेला असतो म्हणून बरं आहे. मग त्या भुश्शातच ते लोळतात आणि कोलांट्या मारतात. कधी कधी जादूचे खेळ करून दाखवण्याची त्यांना हुक्की येते; पण जादू करताना त्यांचा होतो काहीतरी गडबड घोटाळा !

आता अशी कल्पना करा की असाच एक विदूषक एका सुप्रभाती उठला आणि तंबूबाहेर चालायला लागला. खिशात एक दमडी नाही, चाबुकस्वाराला काही सांगितलेलं नाही, अंगावरचा विदुषकी पोशाख उतरलेला नाही. हातात नुसती कपड्यांची बॅग पण नाही—आणि हा आपला चाललाय सर्वांना सोडून दूर कुठंतरी.–कुठं ? देव जाणे ! तसं म्हणाल तर त्याला आई नाही, बाबा नाहीत; पैसेवाले नातेवाईक नाहीत. मग जाणार कुठं हा ? शिक्षण म्हणाल तर शून्य ! शाळेचं कधी तोंडच पाहिलेलं नसणार यानं !

डोळ्यांपुढं आणा ते दृश्य. ज्या गावात सर्कस उतरली आहे तिथल्या रस्त्यावरून खाडखाड करीत ही स्वारी बाहेर पडली. कुजबुजणाऱ्या रानावनातून दूर गेली—दुसऱ्या गावी. तिथं एक भटाऱ्याचं दुकान आहे. आणि लठ्ठंभारती भटारी उर्फ पाववाला दारातच उभा आहे. तो या मूर्तीकडे पाहतो अन् विचारतो, "मोठं अजब ध्यान आहे तुझं ! कोण रे बाबा तू ?"

आणि हा म्हणतो, "मी ? मी आहे एक फिरता असिस्टंट भटारी ! आहे का माझ्याजोगतं काम तुमच्याकडे ?"

आता असं समजा की भटाऱ्यानं ठेवला याला नोकरीवर. खरं म्हणजे यानं जन्मात कधी कणीक तिंबलेली नाही; केक बीक भाजणं तर सोडाच ! तेव्हा यानं तिथंही काहींतरी गडबड घोटाळा करून ठेवला तर नवल नाही.—मग, घोटाळा केल्यावर पुढं ?

पुढं अर्थात् भटारीदादा त्याला हाकलून देतात. हा आपला जातो रस्त्यावरून खाडखाड करीत पुढं. दुसऱ्या गावी येतो. असं समजा की तिथं त्याला एक चांभार भेटतो. तो म्हणतो, "कोण रे बाबा तूं ?" आणि विदूषक उत्तर देतो, "मी ? मी आहे एक फिरता असिस्टंट चांभार ?"

"फारच चांगलं !" चांभारदादा म्हणतो, "मग सरळ घरात ये. माझा मदतनीस पडलाय आजारी आणि काम तर चिक्कार तुंबलंय. उद्या सकाळपर्यंत बुटांच्या वीस जोड्यांना तळ ठोकायचेत !"

अरे देवा ! या वेळचा गडबड घोटाळा चांगलाच महाग पडणार की ! काम नीट करील तर तो विदूषक कसला ? टाचेखाली खोट मारायची तर हा पुढं बोटांखाली मारील; अन् खिळे तर असे ठोकील की काट्यांवरून चालल्यागत वाटावं !

असा चमत्कारिक माणूस असतो हे तुम्हाला खरं तरी वाटेल ? पण होता बरं का असा माणूस ? शप्पथ होता. म्हणजे वर्षं खूप लोटली त्याला, हे कबूल. सहाशे वर्षं म्हणा ना. इतिहासात ज्याला मध्ययुग म्हणतात ना, त्या काळात होऊन गेली ही स्वारी ! युरोपमधल्या जर्मनी देशात. सर्कशीतला विदूषकच होता तो. साऱ्या देशभर भटकला आणि जिथं जाईल तिथं त्यानं घोटाळा करून ठेवला. मग तो घोटाळा निस्तारून परत सगळं ठाकठीक करता करता लोक बिचारे थकून गेले. या अजब माणसाचं नाव होतं 'टिल् औलनश्पीगल'– जर्मन नाव. तुम्हाला समजायला सोपं जावं म्हणून त्याला टिल् किंवा टिल्लू केलय या पुस्तकात. या टिल्लूला एकच काम उत्तम यायचं. ते म्हणजे दोरीवरून चालणं. पण त्याला सर्कशीत किंवा जत्रेत खेळ करून दाखवणं आवडत नसे. कारण मग लोक हसतात ना ? आणि याला तर लोकांनी आपल्याला हसावं हे आवडत नसे. त्याचा हट्ट हा की मी लोकांना हसणार !

आणि म्हणून तो इथून तिथं, तिथून तिथं, असा भटकत राहायचा. जिथं जिथं तो जाई तिथं त्याच्यासाठी काहीतरी काम वाढून ठेवलेलं असेच. म्हणजे याला न येणारं काम. हा आपला ते करायचा. म्हणजे बिघडवायचा. एकामागून एक किती धंदे केले त्यानं — भटारी, चांभार, ज्योतिषी, डॉक्टर, घिसाडी, आचारी अन् भटजी पण ! झालंच तर सुतार, खाटीक, आगपेट्या अन् एकदा तर प्रोफेसरही झाला तो ! असं एकही काम नसेल की जे यानं हाताळलं नाही. आणि त्यांपैकी एकही कामाची त्याला काडी इतकी माहिती नव्हती हे विशेष.

इतकं असून आम्ही असं म्हणू या की या टिल्लूसारखा विदूषक जगात दुसरा झाला नाही. कारण तो ज्या गमती करी त्या खऱ्या जीवनांत करी—सर्कशीत नाही. ज्यांच्या तो खोड्या काढी, त्यांतले काही लोक मजा वाटून हसत. त्याच्या खोड्यांना ते फारसं महत्त्व देत नसत. हे लोक खरे हुशार म्हणायचे. पण बाकीचे पुष्कळजण भयंकर रागावत अन् टिल्लूचा सूड उगवीपर्यंत त्यांना चैन पडत नसे. हे लोक मूर्ख म्हणायचे. कारण टिल्लूची आठवण उत्तम होती. तो पुन्हा त्याच गावी यायचा आणि त्यांची पुन्हां रेवडी उडवायचा. मग बिचारे काळे ठिक्कर पडत. शेवटी हसण्याचा मान नेहमीच टिल्लूला मिळायचा.

या टिल्लूबद्दल खूप गोष्टी लोकांत प्रसिद्ध आहेत. त्या सगळ्याच मी सांगू लागलो तर हे पुस्तक चिक्कार जड होईल अन् तुम्हाला ते उचलायचं नाही. म्हणून त्याच्या फक्त बाराच भानगडी मी सांगणार आहे. सुरवात अर्थात् पहिल्या भानगडीपासून करतो.


टिल्लूची पहिली भानगड म्हणजे बाप्तिस्मा.—बडा शब्द हवा असेल तर नामकरणविधी.

# टिल्लूचं तिहेरी बारसं

सांगायला वाईट वाटतं, पण खरं आहे ते. या बिचाऱ्या पोराचा तीन वेळा बाप्तिस्मा झाला. बाप्तिस्मा म्हणजे बारसं. मुलाचं बारसं करताना भटजी त्याच्या अंगावर तीर्थ शिंपडतो. त्याला आंघोळच घालतो म्हणाना ! या मुलाला तीन वेळा आंघोळ घडली. मोठेपणी तो विचित्र वागला त्याचं हेच् तर कारण नसेल ? देव जाणे ! काही असू शकतं !

या मुलाचं टिल् औलनश्पीगल नाव फार जंगी वाटतं ? ठीक आहे. आपण त्याला नुसतं टिल् किंवा टिल्लू म्हणू या.

टिल्लूचं बारसं तीनदा झालं असलं तरी त्याचा जन्म एकदाच झाला. तीनदा नाही. जर्मनीतल्या एका खेडेगावी. गावाचे नाव क्नाएटलिंगन्. गाव अगदीच लहान, म्हणून बारशासाठी



त्याला आम्ब्लेबन शहराच्या देवळात नेलं. भटजी होते आर्नोफ फाफन्मेयर. बापरे ! तोंडाला फेस येतो नाही, हे नाव घेताना ?

या फाफन्मेयरनी बारशाचा विधी छानच केला. टिल्लूच्या आईला बरं नव्हतं, म्हणून ती निजूनच होती. गावातल्या बायका मुद्दाम शहरात आल्या होत्या, त्यांच्या मतं समारंभ सुंदर झाला. टिल्लूबाळ भसाड्या आवाजात रडत होता खरा, पण म्हणून काय झालं ?

हा त्याचा पहिला बाप्तिस्मा.

देवळातून सर्व मंडळी खाणावळीत गेली. सर्वांना तहान तर लागलेली होतीच; पण टिल्लूच्या बाबांचं सर्वांना निमंत्रणही होतं. सर्वजण वाटेल तशी बीर प्याले आणि सर्वांनी वाटेल तशी भाषणं केली.

सर्वांत जास्ती तहान नर्सला लागली होती. कारण गावातून शहरापर्यंत बाळाला आणलं होतं ते तिनंच. भरतकाम केलेल्या छोट्या छान गादीवर निजवून. त्यामुळे नर्सबाई जास्ती ग्लास बीर प्याल्या. खूप पिणं झाल्यामुळं, संध्याकाळी मंडळी जेव्हां क्नाएटलिंगन् गावी परत जायला निघाली तेव्हा कुणालाही सरळ चालवत नव्हतं. नर्सबाईचं तर विचारूच नका. एका ओढ्या-वर फळीचा चिंचोळा पूल होता, तो ओलांडताना बाईला एकदम चक्कर आली आणि ती फळीवरून सरळ पाण्यात पडली—हाता-तल्या टिल्लूसकट. हा टिल्लूचा दुसरा बाप्तिस्मा.

सुदैवानं कुणालाही लागलं नाही. उन्हाळा होता, त्यामुळं ओढ्याचं पाणी आटलेलंच होतं. पण दोघंही चिखलात न्हाऊन निघाली. नर्सबाई रडत सुटली. टिल्लूचे बाबा ओरडत सुटले. आणि चिमुकल्या टिल्लूनं तर टाहोच फोडला. त्यावेळी काय

अवतार दिसत होता बाळाचा ! अंगाला इतका चिखल लागला होता की त्यात बाळ घुसमटलं होतं.

गावात पोचल्यावर बाईनं आधी टिल्लूला एका लाकडाच्या टबात टाकलं; मग त्याच्या अंगावर पाणी ओतून त्याला साफ-सूफ केला. हा त्याचा तिसरा बाप्तिस्मा.

फाफन्मेयर भटजींना ही सगळी हकीगत दुसऱ्या दिवशीं कळली. पांढऱ्या शुभ्र केसांनी भरलेलं आपलं डोकं हलवीत ते काळजीच्या सुरात म्हणाले, “ पोराचं मोठेपणी सगळं ठीक होवो म्हणजे झालं ! तीन तीन बाप्तिस्म्यांतून गेलेला कार्टा हा. किती झालं तरी अती ते अतीच ! ”

आणि आता पुढे वाचाल तेव्हा तुम्हाला कळेल, की फाफन्-बाबांना वाटलेली भीती अगदी अगदी खरी ठरली !



# टिल्लू दोरीवरून चालतो

टिल्लू मोठा झाला तसा तो भलताच खट्याळ बनला. शक्य तेवढे प्रकार करून त्यानं गावातल्या लोकांना हैराण केलं. त्याच्या आईवडिलांकडे लोक सारखे गाऱ्हाणी घेऊन यायला लागले. पण गंमत अशी की तक्रार केली तरी पुरावा देणं सोपं नसे. बाबांना मात्र वाटे की लोक सांगतात ते खोटं नसणार. आणि थोड्या मारानं काही बिघडायचं नाही. आणि म्हणून ते त्याला पिटून काढीत. पण आपण का पिटतो आहो हे मात्र त्यांचं त्यांना समजत नसे.

असेच काही दिवस गेल्यावर बाबाही कंटाळून गेले. बिचारे आजारी पडले आणि एक दिवस वारले.

मग टिल्लूची आई त्याला घेऊन गाव सोडून गेली. तिचं माहेर साले नदीच्या काठी होतं तिकडं गेली. या वेळी टिल्लू सोळा वर्षांचा होता. काहीतरी कामधंदा शिकायचं त्याचं वय होतं. पण ते सोडून हा काय करी ? आईनं कपडे वाळत घालण्यासाठी माळ्यावर दोरी बांधली होती तिच्यावरून चालता येतं का हे हा पाहायचा. आईनं ते बघितलं, तशी लगेच माळ्यावरच्या खिडकीतून तो धडपडत बाहेर पडला अन् छपरावर उभा राहिला. तिची वाफ जिरेपर्यंत हा तिथंच उभा होता. माळ्यावरच्या खिडकीतून नदी दिसायची. टिल्लूनं ती पाहिली आणि मग दोरीवरून चालण्याचा चांगला सराव झाल्यावर त्यानं एक

दिवस काय केलं–आपली दोरी त्यानं या घराच्या खिडकीपासून नदीपार दुसऱ्या घराच्या खिडकीपर्यंत ताणून बांधली.

आणि मग जेव्हा त्यानं दोरीवर पाय ठेवला आणि एकेक पाऊल टाकीत स्वारी नदीकडे निघाली, तेव्हा लोक आ वासून अन् डोळे फाडून ते दृश्य पाहू लागले. रस्त्यात जमलेली मुलं टकाटका पाहात होती. शेजारी पाजारी खिडक्यांतून ओणवून पाहात होते. नदीच्या दोन्ही तीरावर लोक जमून वर हवेत टकमका पाहात होते. दोरी जशी ताठ होती तसेच सर्वजण ताठ बनले होते. काय होतं नि काय नाही....

शेवटी ही बातमी टिल्लूच्या आईपर्यंत गेली. म्हातारपणामुळं हाडं खिळखिळी झालेली; पण तशीच बिचारी माडीवर धावली. माळ्यावरच्या खिडकीतून तिनं बाहेर पाहिलं. जे दिसलं ते पाहून तिनं कपाळावर हात मारला. मास्टर टिल्लू दोरीच्या मध्यावर उभा होता. खालून नदी वहात होती अन् हा आपला वर कसरत करीत होता.

टिल्लूची आई मोठी खंबीर बाई होती. तिनं आपली बटाटे तासायची सुरी घेतली आणि—सपकन् दोरी कापून टाकली.

टिल्लूनं तिला पाहिलंही नव्हतं. तो मारे हवेवर चालत होता. पण आता—डुबुक्! हवेतून थेट पाण्यात पडला. मग नाक मुठीत धरून गटांगळ्या खात तो कसाबसा पोहू लागला. काठावर जमलेली मुलं व आसपासचे लोक खो खो हसत सुटले. आरडाओरड करून त्यांनी टिल्लूची हुर्यो केली.

तो एकदाचा धडपडत काठाला लागला. त्यानं असं दाखवलं की जशी काही आपल्याला लोकांची टिंगल ऐकूच आली नाही. पण मनात मात्र त्यानं ठरवून टाकलं की आज हसणारांचे उद्या दात पाडीन तरच मी खरा!


आणि दुसऱ्याच दिवशी टिलूनं पुन्हा दोरी ताणून धरली. पण या खेपेस त्यानं तिचं पहिलं टोक माळ्यावरच्या खिडकीत बांधलं नाही. हो—पुन्हा कुणी नदीत बुचकळी घ्यावी ?

'फिरून फिरून न्हाईल त्याची कातडी जाईल' अशी जर्मन भाषेत एक म्हण आहे.

अं हं ! या वेळी टिलूनं दोरी बांधली ती दुसऱ्याच दोन घरांना. खूप खूप उंच—म्हणजे आईला दिसूं नये अशा उंच जागी. मुलं अर्थात खुषीत होती. पुन्हा सगळी गंमत बघायला मिळणार म्हणून ती उड्या मारीतच आली. शेतकरी लोक नि त्यांच्या बायका पण आल्या. सर्वजण हसत होते; टिलूची थट्टा करीत होते. "आजही पडून दाखव, बरं का ?" म्हणून त्याला चिडवीत होते.

आणि टिलू उलट ओरडत होता—"आज तुम्हाला जास्तच मजा दाखवतो. तुम्ही सगळे असं करा—डाव्या पायातला बूट तेवढा काढा आणि मला द्या—इथं द्या, दोरीवर ! प्रत्येकानं एक बूट द्यायचा, बरं का ? डावाच बूट ! तुम्हाला थोडा त्रास देतोय, पण इलाज नाहीं. बुटांशिवाय हा खेळ व्हायचा नाही !"

पहिल्यानं लोक तयार होईनात. बूट द्यायचा ? काय म्हणून पण तीच तर गंमत होती. का हवा बूट याला ते कळावं म्हणून प्रत्येकाला चुटपुट लागली होती. शेवटी काढला प्रत्येकानं डावा बूट आणि दिला फेकून टिलूकडं. टिलूजवळ एकशेवीस डाव्या बुटांचा ढीग जमला. ते सारे बूट त्यानं नाड्यांनी एकत्र बांधले. बुटांची ती जड माळ हातांत धरून तो दोरीवर चढला तेव्हां बिचारा वजनानंच वाकला होता.



खाली एकशेवीस लोक उभे होते – फक्त उजव्या पायात बूट घातलेले. टिलू दोरीवरून चालू लागला. तो एकेक पाऊल जपून टाकीत होता. दोरीच्या मध्यावर पोचताच त्यानं ती बुटांची माळ गोफणीसारखी मागंपुढं फिरवली अन् दिली सोडून खाली. रस्त्यावर बुटांचा खच पडला. टिलू वरून हसत खिदळत ओरडला, "ते तुमचे बूट ! घ्या आपापला शोधून. घोटाळा करूं नका बरं !"

रस्त्यात एकशेवीस बूट पडले होते आणि सभोवती एकशेवीस माणसं उभी होती. प्रत्येकानं पायात एकच बूट घातलेला. त्या लोकांनी आता धमाल केली. सर्वजण बुटांच्या राशीवर तुटून पडले. आपला बूट शोधण्यासाठी प्रत्येकाची गडबड उडाली. आणि मग अशी झुंबड उडाली की सांगता सोय नाहीं. हा त्याला मारतोय, तो याला पिटतोय; एक दुसऱ्याच्या झिंज्या उपटतोय; कुणी रस्त्यात गडबडा लोळतोय, तर कुणी बैलासारखा ओरडतोय, असा प्रकार सुरू झाला.



शेवटी प्रत्येकाला स्वताचा डावा बूट सापडला. पण हा गोंधळ एकशे त्रेचाळीस मिनिटं चालला होता आणि लोकांचे अवतार काय दिसत होते, म्हणून सांगू? डोक्यांना टेंगळं आलेली, पँटींना भोकं पडलेली. सात दात रस्त्यात धूळ खात पडले होते; त्याना कुणी मालकच मिळत नव्हता. आणि एकोणीस शेतकरी नि अकरा मुलं इतकी लंगडत होती, की ती घरापर्यंत कशी पोचली असतील, देवाला ठाऊक!

"हातात गावू दे तर खरा तो टिलचा–" लोक म्हणत होते, "त्याला चांगला बदडून काढू!"


पण टिलचा हातात गावेल तर ना? या प्रकारानंतर टिलूनं तीन महिने दाराबाहेर डोकं काढलं नाही. बिळातल्या उंदरासारखा लपून राहिला. त्याची आई खूष झाली. म्हणाली, "असंच वागावं बरं बाळ? आता कसा शहाणा झालास!"

बिचारी भोळी आई!

# मधाच्या मोहळात टिल्लू

एक दिवस टिल्लू आईबरोबर शेजारच्या गावी बाजाराला गेला होता. तिथं तो सपाटून बीर प्याला. बीर चढली. त्याला गरगरायला लागलं; डुलकी येऊ लागली. त्यानं अवती भवती पाहिलं — कुठं सावलीची जागा दिसली तर तिथं झोपू तरी. त्याला एक बाग दिसली. बागेत सामसूम होती. बऱ्याच करंड्या तिथं मांडलेल्या होत्या. करंड्या म्हणजे मधाची मोहळं होती ती. त्यातलं एक मोहळ रिकामं होतं. त्यात हा पठ्या चढला आणि अंग दुमडून घेऊन झोपला. दुपारी बारा वाजेपासून ते रात्री बारा वाजेपर्यंत !

इकडे त्याची आई त्याला शोधत बाजारभर हिंडली. शेवटी तिला वाटलं, हा केव्हाच घरी गेला असावा.



मध्यरात्रीच्या सुमाराला दोन चोर त्या शांत बागेत आले. एकादं मोहोळ चोरू अन् मध विकू असा त्यांचा बेत होता.

" सर्वांत जड असेल ते घेऊ बरं का ? " एक चोर म्हणाला. " म्हणजे खूप मध मिळेल. "

" ठीक " दुसरा म्हणाला. त्यांनी मोहळं हलवून पाहिली. टिल्लू ज्यात झोपला होता ते त्यांना सर्वांत जड लागलं. तेव्हां चोरांनी ते उचललं अन् धडपडत बागेबाहेर नेलं. मग तो बोजा घेऊन ते निघाले आपल्या गावाकडे.


त्या हालचालीनं टिल्लूला जाग आली. यानी आपली झोप मोडली आणि आता भलत्या गावाकडं आपल्याला चालवलं म्हणून त्यांच्यावर चिडला. थोडं अंतर गेल्यावर त्यानं हळूच मोहळाबाहेर हात काढला अन् पुढं चाललेल्या माणसाचे केस जोरात उपटले.

" उई ! " चोर ओरडला. " तुला वेडबीड तर लागलं नाही ? केस का उपटतोस माझे ? "

अर्थात् त्याला वाटत होतं की हे मागच्या चोराचं काम आहे !

पण त्या मागच्या चोराला कळेना — हा असं काय बोलतो ? " तुझा मेंदू आहे ना जाग्यावर ? " तो ओरडला. " घरातलं जड सामान हलवावं तसा मी वाकलोय या ओझ्याखाली. आणि तू माझ्यावर उखडतोस ? मी रे कशाला तुझे केस उपटीन ? "

टिल्लूला मजा वाटली. थोड्या वेळानं त्यानं मागच्या चोराचे केस उपटले. इतक्या जोरात उपटले की त्याच्या मूठभर झिंज्या टिल्लूच्या हातात आल्या.



" अयाई ग ! आता मात्र कमाल केलीस ! " मागचा चोर ओरडला. " मघाशी डोक्यात घेतलंस की मी तुझे केस उपटतोय. आणि आता माझे केस मुळासकट उपटून माझी खोपडी र ंबाळ केलीस की तू ! "

" हट् ! " दुसरा चोर गुरगुरला. " काहीतरी बडबडू नकोस ! अंधार इतका आहे की मला वाटसुद्धा दिसत नाही. मागे हात नेऊन तुझे केस उपटणं शक्यतरी आहे का मला ? "

आणि दोघे लागले भांडायला. एकामेकाना शिव्या देत, क हले काय, किंचाळले काय ! टिलूला हसू फुटत होतं, पण त्यानं ते कसंबसं आवरलं आणि पाच मिनिटानंतर त्यानं पुढल्या चोराचे केस उपटले. असे ज्याम जोरात उपटले, की त्याचं मोहळावर आपटलं. त्यानं लगेच मोहोळ टाकलं. तो मागे आणि दोन्ही हातांच्या मुठी वळून त्यानं आपल्या थोबाडात थडाथड ठोसे लगावले. तेव्हा त्याही टाकलं. आणि तोही लागला याला मारायला दोघेही वीर जमिनीवर कोसळले. कुण ळयात गेल्या, काही पत्ता लागेना. म

ओचकारे बोचकारे यांची धमाल उडाली. आधीच संतापामुळं डोळ्यांपुढं काळोखी आलेली त्यामुळं कुण।ब्रागेत आले. धड सापडत नव्हता. टिल्लू मात्र आपल्या मोहळात आराम पडला होता. लवकरच तो डोळे मिटून झोपी गेला.

सकाळ झाली तेव्हा सूर्यानं त्याला जाग आणली. तो उठ आणि चालायला लागला. पण तो आईकडे मात्र गेला नाह त्यानं एका चोरांच्या नायकाकडे नोकरी धरली–त्याचा मोतदा म्हणून. मोतद्दार म्हणजे घोडा संभाळणारा. पण याला घोड्याच काय माहिती होती ? शून्य ! त्यामुळं चोरांच्या नायकानं त्याल आपल्या गुहेबाहेर हाकलून दिलं !



# टिल्लू रोगी बरे करतो

शंकाच नको त्यात. लहानपणी जो खूप खोड्या करतो तो जरा मोठा झाला तरी स्वस्थ बसत नाही; आणखी खोड्या करतो. टिल्लूचं असंच झालं. त्याचा खोडसाळपणा दर वर्षी वाढतच चालला. कितीतरी धंदे केले त्यानं! अंगातला सदरा बदलावा तसा तो धंदा बदली. आणि एकाच जागी तर त्याला बसणंच शक्य नव्हतं. कारण मग कुणीतरी त्याला मरे मरेतो पिटलं असतं. तेव्हा भटकणं भागच होतं. वीस वर्षांचा होईपर्यंत त्यानं देश पालथा घातला. आपल्या खिशात काय काय आहे हे जसं त्याला तोंडपाठ असे तसं जर्मनीत कुठं काय आहे तेही त्याला तोंडपाठ असे.

एक दिवस तो न्यूरेनबर्ग शहरात आला. तिथं प्रत्येक देवळाच्या दारावर अन नगरपालिकेच्या हॉलवर त्यानं जाहिराती चिकटवल्या. 'चमत्कार करणारा डॉक्टर--टिल् औलनश्पीगल'

लवकरच एका इस्पितळाचे प्रमुख त्याच्याकडे आले अन् म्हणाले, "डॉक्टरसाहेब, आमच्या इस्पितळात इतके रोगी आहेत की आता त्यांचं काय करावं हा मला प्रश्न पडला आहे. सगळ्या खाटा भरल्या आहेत अन् पैसे तर पुरत नाहीत. काय करावं? तुम्ही आम्हाला सल्ला देता का?"

टिल्लूनं कान खाजवीत म्हटलं, "हो--हो! देतो की, पण— साहेब, सल्ल्याला किंमत पडते!"

"किती?"

" दोनशे मोहरा " टिल्लू म्हणाला,

" बापरे ! साहेब आ वासून पाहात राहिला. दोनशे सोन्याची नाणी म्हणजे भारीच किंमत झाली. " एवढे पैसे घेऊन तुम्ही उपाय कोणता करणार ? त्यानं विचारलं.

" उपाय असा करीन की एका दिवसात इस्पितळातले सगळे रोगी खडखडीत बरे होतील. यात काही चूक झाली तर एकही पैसा देऊ नका मला. "

" उत्तम ! " इस्पितळाचे साहेब म्हणाले. त्यांनी ताबडतोब टिल्लूला आपल्याबरोबर इस्पितळात नेलं. आणि रोग्यांना सांगितलं की " नवे डॉक्टर आले आहेत ते तुम्हाला बरे करतील. त्यांचं ऐका. " आणि आपण आपल्या कचेरीत गेले. टिल्लू रोग्यां-बरोबर एकटाच राहिला.

टिल्लूनं इस्पितळातून फेरी मारली. प्रत्येक रोग्याजवळ तो गेला आणि त्याच्या कानाशी त्यानं काही कुजबुज केली.

प्रत्येकाला त्यानं एकच सांगितलं.

"तुम्हाला सर्वांना बरं करायला आलो आहे मी. तुला–याला–त्याला–सर्वांना. मला एक विलक्षण इलाज माहीत आहे. त्यानं तुमची सर्वांची दुखणी बरी होतील. इलाज सोपा आहे. तुमच्या-पैकी एकाला जाळून टाकायचं. त्याची राख बाकीच्यानी अंगाला लावायची–की तुम्ही बरे व्हाल ! कुणाला जाळायचं ते मी आधीच ठरवून ठेवलं आहे. जो सर्वांत जास्त आजारी असेल त्याला पेटवून द्यायचं ! काय ? कल्पना चांगली आहे की नाहीं ? " आणि मग रोग्याच्या अंगावर वाकून तो हळूच म्हणाला, " आणखी अर्ध्या तासानं मी साहेबांना घेऊन येईन. बरे झालेले रोगी असतील त्यांना साहेब घरी धाडतील. मित्रा, मला वाटतं,



तूही जावंस. कारण शेवटी उरेल त्याची राख होईल. इलाज नाही, कारण हा डाक्टरी इलाजच तसा आहे. ”

इस्पितळातल्या सर्व रोग्यांना त्यानं हेच सांगितलं. मग तो साहेबांना घेऊन आला. साहेब मोठ्यानं म्हणाले, “ ज्याला बरं वाटत असेल त्यानं घरी जावं. ”

त्याबरोबर सर्व रोगी उठले अन चालायला लागले. तीन मिनिटांत इस्पितळ रिकामं ! एकूणएक रोगी बाहेर पळाले, किंवा लंगडत खुरडत गेले—इतके घाबरले होते बिचारे ! त्यातले काही जण तर दहा दहा वर्षं या इस्पितळात ठाण देऊन बसलेले होते.

साहेब आ करून पाहात राहिले. त्यांच्या तोंडून शब्दच फुटेना. मग ते धावत आपल्या कचेरीत गेले आणि दोनशे वीस मोहरा घेऊन पळत आले. पैशाची थैली टिलूपुढे करीत ते म्हणाले, वीस मोहरा मी खुषीनं तुम्हाला बक्षीस देत आहे. जगात तुमच्यासारखा डॉक्टर मिळणार नाही हेच खरं ! ”

“ बरोबर ! ” टिलू म्हणाला. त्याला म्हणायचं होतं की मोहरा बरोबर दोनशेवीस आहेत. थैली खिशात कोंबून त्यानं साहेबाचा निरोप घेतला आणि शक्य तेवढ्या झपाट्यानं स्वारी न्यूरेनबर्ग शहराच्या बाहेर पडली.




दुसऱ्या दिवशी आपले एकूण एक रोगी पुन्हा इस्पितळात आले आणि आपापल्या खाटेवर झोपून राहिले.

साहेब भडकले. "हा आहे काय तमाशा?" ते म्हणाले. "मला वाटलं, डॉक्टरांनी तुम्हाला बरं केलं!"

तेव्हा रोग्यांनी खरी हकीगत सांगितली. "मागे राहिला असता त्याची राख झाली असती" हे ऐकल्यावर साहेबांना हसावं की रडावं तेच कळेना.

"मी तरी मूर्खच!" ते म्हणाले, "लुच्यानं मला चांगलंच बनवलं! आणि मी त्याला दोनशे मोहरा तर दिल्याच, पण वर वीस मोहरा बक्षीस दिल्या!"



# घुबडं नी मांजरं भाजणारा टिल्लू

एक दिवस टिल्लू ब्रुन्सविक शहरात आला. रात्री राहण्यासाठीं तो खाणावळ शोधीत असता भटारखान्याच्या दारात उभा असलेला भटारी त्याला दिसला. भटारी म्हणजे पाववाला.

भटाऱ्यानं त्याला खाणावळीचा पत्ता सांगितला. मग नवल वाटून तो म्हणाला, " तू आहेस तरी कोण ? "

" मी ? " टिल्लू म्हणाला, " मी एक फिरता भटाऱ्याचा मदतनीस आहे. "

हे ऐकून भटारी खूष झाला. कारण त्याला हाताखाली कुणीतरी माणूस हवाच होता. तेव्हा टिल्लूला त्यानं ठेवून घेतलं. पगार, जेवणखाण, राहायला खोली. मालक स्वतः पण काम करायचा. त्याचं पाहून टिल्लू करायचा. त्यामुळं या धंद्याचं त्याला काडीइतकं ज्ञान नाही ही गोष्ट पहिले दोन दिवस मालकाच्या लक्षातच आली नाही. तिसऱ्या दिवशी मालकाला वाटलं, आज जरा लवकर झोपावं. त्यानं टिल्लूला हाक मारून म्हटलं, " हे बघ–आज रात्री तू एकट्यानंच काम करायचं. मी आता गेलो की उद्या सकाळपर्यंत येणार नाहीं. "

" ठीक आहे " टिल्लू म्हणाला. " पण आज काय भाजू ? "

" चांगला प्रश्न विचारलास ! " भटारी म्हणाला. " माझा

मदतनीस म्हणवतोस आणि काय भाजायचं ते माहीत नाही तुला ? भाज जा घुबडं नि मांजरं ! ”

म्हणजे “ विचारतोस काय ? वाटेल ते भाज ” असा याचा अर्थ. पण टिल्लूनं शब्दशः तसं केलं.

मालक निघून गेल्यावर त्यानं कणीक भिजवली आणि मग रात्री दहा वाजेपासून ते पहाटे तीन वाजेपर्यंत कणकीची घुबडं नि मांजरं भाजली.

सकाळी मालक भटारखान्यात आला; आणि डोळे फाडफाडून पाहू लागला. त्याला वाटलं, आपण चुकून एखाद्या शिकारखान्यात तर आलो नाही ? जिकडं पाहावं तिकडं आपली खुसखुशीत नि गुबगुबीत घुबडं नि मांजरं ! साधा पाव कुठं दिसत नाही–केक पण नाही !

त्यानं हाताची मूठ वळली अन् थाडदिशी टेबलावर आपटली. “ काय केलंस हे ? ” तो ओरडला.

“ तुमच्या हुकुमाप्रमाणं केलं, साहेब ! ” टिल्लू म्हणाला. तुम्ही सांगितलत घुबडं भाज, मांजरं भाज. भाजली आहेत की नाही खऱ्यासारखी ? पण किती त्रास पडला म्हणून सांगू ? ”

आता मात्र हद्द झाली ! टिल्लूचा हा उद्धटपणा भटाऱ्याला आवडला नाहीं. त्याची मानगूट धरून त्यानं त्याला गदागदा हलवला. इतका की त्याचे दात वाजू लागले.

“ चालता हो माझ्या घरातून ! ” भटारी ओरडला. “ हरामखोरा ! पुन्हा इथं पाऊल टाकशील तर खबरदार ! ”



" पहिल्यानं मला सोडा–मग मी जाईन " टिल्लू म्हणाला. " असं धरून ठेवलंत तर कसा जाणार ? "

मालकानं त्याला सोडलं तशी टिल्लू पळायला लागला. पण पुन्हा त्याची मानगूट धरून मालक म्हणतो, " एवढी कणीक नास केलीस त्याचे पैसे टाक आधी ! "

" देतो " टिल्लू म्हणाला. " पण मग ही घुबडं नि मांजरं माझी झाली. पैसे द्यायचे तर माल मिळाला पाहिजे ! "

मालकानं ते कबूल केलं. टिल्लूनं त्याला पैसे दिले आणि ती सगळी घुबडं नि मांजरं एका टोपलीत घालून तो निघाला.

त्या दिवशी दुपारी देवळापुढच्या चौकात लोकांची गर्दी जमली. गर्दीत मध्यभागी टिल्लू उभा होता आणि " घुबडं खा !– मांज़रं खा ! " म्हणून ओरडत होता. त्याचा टोपलीतला माल झपाट्यानं विकला गेला. टिल्लूच्या खिशात पैसे खुळखुळू लागले. तो निघाला.


ही बातमी गावभर पसरली. भटाऱ्याला कळलं तेव्हा दुकान बंद करून, तो शर्यतीतल्या घोड्यासारखा धावत आला.

" प-प-पैसे मिळवून गेला गु-गु-गुलाम ! " तो धापा टाकीत म्हणाला. " आणि ती सोंगं भाजण्यासाठी माझी ल-ल-लाकडं जाळलीन् त्याचं काय ? चू-चू-चूल वापरलीन् त्याचं काय ? ते काही नाही ! तो लफंगा माझं देणं लागतो ! त्याला प-प-पकडून तुर्-तुर्-तुरुंगात टाकीन तरच मी खरा भट्-भट्-भटारी ! "

पण चौकात टिल्लू होता कुठं ? तो केव्हाच डोंगरापसार झाला होता. आपल्याजवळचं प्रत्येक घुबड नि प्रत्येक मांजर त्यानं

विकून टाकलं होतं. इतकंच नाही तर भटारीबुवाची टोपली पण त्यानं वोपली होती. वोपली म्हणजे विकली.

त्यानंतर पुष्कळ वर्षं लोटली तरी त्या बिचाऱ्या भटाऱ्याची आठवण काढून ब्रुन्सविकचे लोक खो खो हसत असत.



# टिल्लू पहारेकरी बनतो

एकदा टिल्लूनं अन्हाल्टच्या काउन्टसाहेबांकडं नोकरी धरली. काऊन्ट म्हणजे सरदार.

सरदारसाहेबांनी आपल्या बऱ्याच आश्रित शिलेदारांना नि जमीनदारांना बेर्नबुर्गच्या किल्ल्यात एकत्र जमवलं होतं. किल्ल्याला लागून जी खेडकऱ्यांची शेतं होती, त्यांत चोरांच्या टोळ्या फार धुमाकूळ घालीत असत. हे चोरही सरदार होते. त्या काळी एकमेकांना लुटणं एवढाच उद्योग कांही सरदार करीत. कधी कधी हे चोर सरदार गावकऱ्यांच्या घरांना आगी लावीत, तर कधी त्यांची गुरं पळवून नेत.

किल्ल्याच्या सर्वांत उंच बुरुजावर टिल्लूची नेमणूक झाली. तिथं तो रोज टेहेळणी करीत बसे. शत्रू येताना दिसला की टिल्लूनं बिगुल वाजवून इशारा द्यायचा असं ठरलं होतं, कधी कधी तटावरून टिल्लू आतही डोकावयाचा. किल्ल्याच्या चौकात लांबच लांब टेबलं मांडलेली असत; आणि तिथल्या खुर्च्यांवर शिलेदार नि जमीनदार दिवसभर खात बसलेले असत. त्यांच्या खाण्यापिण्याला खंड म्हणून नसे.

सरदारसाहेब आपल्या सोबत्यांसह खाण्यापिण्यात इतके दंग झालेले असत की हा बापडा बिगुलवाला बुरुजावर एकटा आहे याची त्यांना आठवणही नसे, त्याला कुणी खायलाही पाठवीत नसे. टिल्लूनं वरून आरडाओरडा केला तरी कुणाचं त्याच्याकडे लक्ष जात नसे. कारण बुरू[illegible]ताच खूप उंच. जागा सोडून

जाण्याची तर त्याची हिंमत नव्हती. कारण "अखंड पहारा कर" म्हणून त्याला बजावलेलं होतं.

एकदा दुपारची वेळ होती. स्वच्छ ऊन पडलेलं होतं. अचानक चोरांचे नाईक घोड्यावर बसून आले. किल्ल्याच्या तटाबाहेर जी गुरं होती ती त्यांनी पकडून नेली; आणि जाताजाता काही धान्य कोठारांना त्यांनी आग लावून दिली. फारच धिंगाणा घातला त्यांनी ! टिल्लू बुरुजाच्या खिडकीत हातांची कोपरं टेकून ते पाहात होता. पण भिंतीवर लटकत असलेलं बिगुल काही त्यानं काढलं नाही. शिलेदारांना या हल्ल्याची बातमी लागली तेव्हा ते धावतच तबेल्यात गेले आणि घोड्यांवर स्वार होऊन त्यांनी चोरांचा पाठलाग सुरू केला. पण तोपर्यंत सगळीकडं शांत झालं होतं. एकाही चोराचं किंवा ढोराचं त्यांना नख दिसलं नाही.

सरदारसाहेब किल्ल्यात परत आले ते रागानं लाल होऊनच, अंगावरचं चिलखतही न उतरता बुरुजाच्या तीनशे तेहतीस पायऱ्या ते दाणदाण चढून गेले आणि ओरडले, " गधड्या ! शत्रू येत असलेला पाहूनही तू बिगुल वाजवलं नाहीस ? काय समजतोस तू स्वताला ? "

" आणि तुम्ही काय समजता स्वताला ? " टिल्लू ओरडला. " मला खायला तरी दिलंत का ? भुकेनं माझ्या पोटाची दामटी वळली होती. मी कसं वाजवणार बिगुल ? "

आणखी एकदा असंच झालं. या खेपेस हेच सरदारसाहेब शत्रूवर हल्ला करायला गेले आणि त्यांची गुरं पळवून परत आले. गुरं किल्ल्यात पोचताच नोकरांनी डझनावारी बैलांची कत्तल केली आणि लोखंडी सळ्यांत घालून ते आख्खेच्या आख्खे विस्तवा-

वर भाजले. पुन्हा किल्ल्याच्या चौकात टेबलं मांडली गेली. सरदारसाहेब नि त्यांचे शिलेदार जमीनदार खुर्च्यांवर बसले अन् खादाडखाऊंसारखे जेवले. भाजलेल्या मांसाचा खमंग वास वर बुरुजापर्यंत गेला; टिल्लूच्या नाकात शिरला. या पहारेकऱ्याला जेवण द्यावं याची कुणाला आठवण झाली नाहीच. पण आज मात्र टिल्लू थांबला नाही. भिंतीवरचं बिगुल काढून त्यानं तोंडात घातलं, गाल फुगवले अन् खिडकीबाहेर ओणवून तो ते जोर-जोरानं फुंकू लागला.

पँ–पँ–पँ–

सरदारसाहेब नि त्यांचे शिलेदार अर्ध्या जेवणातून उठले. धावत जाऊन त्यांनी चिलखतं घातली अन् घोड्यांवर टांग मारून ते धूम दौडत सुटले. इकडे टिल्लू बुरुजावरून ताड ताड उड्या मारीत खाली आला. चौकातल्या टेबलांवरचं मिळेल तेवढं अन्न त्यानं गोळा केलं आणि परत ताड ताड उड्या मारीत तो वर गेला. बुरुजावर बसून त्यानं आता जेवणावर असा ताव मारला, की शेवटी त्याला कंबरपट्टाच बांधता येईना !

सरदारसाहेब परत आले ते जळफळतच, तसेच तडातडा जिना चढून ते बुरुजावर गेले अन् खेकसले, " हा काय फाजील-पणा आहे ? शत्रू कुठंही नसताना बिगुल का वाजवलंस ? "

" उपासमारीनं होतं असं ! " टिल्लू म्हणाला, भुकेनं मी कावलो होतो. डोळ्यांपुढं चक्कर आली अन् शत्रू आलेला नसताना शत्रू दिसायला लागला ! "

" चूप बैस ! " सरदारसाहेब ओरडले. " शत्रू आलेला नसताना जो बिगुल वाजवतो आणि शत्रू आला की गप्प बसतो असला

पहारेकरी काय कामाचा!" आणि लगेच त्यांनी दुसऱ्या माणसाला पहाऱ्यावर नेमलं आणि टिलू पायदळातला शिपाई बनला.

हे काम त्याला मुळीच आवडलं नाही. एकदा शत्रू वेशीजवळ आला तेव्हा शिपाई झटपट बाहेर पडले अन् शत्रूशी लढले. टिलू मागे रेंगाळत होता. सर्वांच्या मागून हळूच फाटकातून आपलं डोकं काढीत होता. तेवढ्यात लढाई संपली. शत्रू पळाला आणि शिपाई परत किल्ल्यात आले. टिलूही परतला. आता पहिला नंबर त्याचा होता.

शत्रूचा दुसरा हल्ला झाला तेव्हाही त्यानं हेच केलं. तिसऱ्या वेळीही हेच. त्याच्या वागण्याची जो तो टिंगल करू लागला. सरदार साहेबांच्याही ते लक्षात आलं. त्यानी त्याची खरड काढली.

"त्याचं असं आहे–" टिलू म्हणाला, "पहारेकरी असताना मला खायला मिळत नसे. तेव्हापासून माझी तब्येत बिघडली ती बिघडलीच. शत्रूशी लढायला मी कसा पुढं होणार? त्यातून समजा–पुढं जायची ताकद असती माझ्या अंगात, तरी परत किल्ल्यात शिरताना पंचाईत नसती का झाली? पुन्हा पहिला नंबर गाठायचा म्हणजे मला वेड्यासारखं धावावं लागलं असतं! पहिला आलो नसतो तर मला खायला कोण देणार होतं? या धावाधावीनं माझी तब्येत आणखीच बिघडली असती!"

"तुला फाशी दिलं पाहिजे!" सरदारसाहेब गुरगुरले.
"छे छे!" टिलू म्हणाला. "ते तर तब्येतीला आणखी वाईट!"

आणि असं म्हणून त्यानं आपलं चंबूगवाळं उचललं अन् तो किल्ल्याबाहेर पडला. लांब लांब टांगा टाकीत त्यानं बर्नबुर्ग शहर मागं टाकलं.

## टिल्लू जमीन घेतो

टिल्लूला फाशीची धमकी एकट्या सरदारसाहेबांकडूनच मिळाली होती असं समजू नका. मागचं प्रकरण रंगल्यावर थोड्याच दिवसांनी लूनेबेर्गच्या ड्यूकसाहेबांनी पण त्याला हीच भाषा ऐकवली. ड्यूक म्हणजे सरदारांचा सरदार. राजाचा जवळचा नातेवाईक. या ड्यूकसाहेबांच्याही प्रांतात टिल्लूनं धुडगूस घातला म्हणे. ड्यूकसाहेबांनी त्याला बजावलं, "चालता हो इथून! पुन्हा माझ्या जमिनीवर पाय ठेवलास तर तुला फासावर लटकावीन!"


तेव्हापासून टिल्लूनं त्यांच्या हद्दीत जायचं सोडलं. आणि तरी एकदा अशी वेळ आली की त्याला जिथं जायचं होतं तिकडं ड्यूकसाहेबांच्या जमिनीवरूनच जावं लागणार होतं. नाहीतर फार लांबचा वळसा पडला असता.

टिल्लूनं काय केलं? एक घोडा घेतला, एक गाडी घेतली आणि गाडीत बसून निघाला. ड्यूकसाहेबांची हद्द येताच तो थांबला. हद्दीच्या अलीकडे एक शेतकरी शेत नांगरीत होता. त्याला एक शिलिंग देऊन टिल्लूनं गाडीभर माती विकत घेतली. मग तो गाडीवर चढला आणि त्यानं स्वताला मातीत पुरून घेतलं फक्त डोकं नि हात तेवढे बाहेर काढले. अशा थाटात स्वारी ड्यूकसाहेबांच्या जमिनीवरून खाडखाड करीत गेली. पाहणाराला वाटावं की हे माणसाचं डोकं आहे की मातीतून वर आलेलं जिवंत फूल? सारीच गंमत!

किल्ल्याजवळून जात असता त्याला ड्यूकसाहेब दिसले. आपल्या नोकराचाकरांना बरोबर घेऊन ते शिकारीला चालले होते. हे ध्यान पाहताच ते थांबले आणि म्हणाले, " तुला हाकललं होतं ना मी ? का आलास पुन्हा ?—थांब. आता तुला फाशीच देतो ! "

" पण मी तुमच्या जमिनीवर पाय ठेवलेला नाहीं ! " टिल्लू म्हणाला. " मी पुरेपूर माझ्या जमिनीवर आहे. ही माझी माती आहे—पैसे मोजून विकत घेतलेली ! समजलात ? "

ड्यूकसाहेब रागानं ओरडले, " चालता होतोस की नाही ? पुन्हा ये तर खरा—तू, तुझी गाडी नि घोडा यांना एकाच माळेत फासावर चढवीन ! "





# गाढवाचा गुरू टिल्लू

काही दिवस तरी टिल्लू कॉलेजात जायचा. इथून तिथं, तिथून तिथं, असं करीत त्यानं कितीतरी कॉलेजं पालथी घातली. आपण हुशार विद्यार्थी आहो असा तो आव आणी; पण त्याचा सारा वेळ दुसऱ्या विद्यार्थ्यांच्या नि प्रोफेसरांच्या खोड्या करण्यात जायचा. तो म्हणे, "मला सगळं येतं – मी काय वाटेल ते करू शकतो." आणि खरोखरीच त्याला कोणताही प्रश्न विचारला तरी उत्तर त्याच्या तोंडावर असे.

एक दिवस टिल्लू एरफुर्टला आला. तिथल्या कॉलेजचे विद्यार्थी नि कॉलेज प्रमुख यांनी त्याची परीक्षा पाहायचं ठरवलं, त्याला कोणता प्रश्न विचारावा म्हणून त्यांनी डोकी घासली, पण प्रश्नच सुचेना. "प्रश्न कोड्यासारखा कठीण हवा" एक म्हणाले, "नाहीतर त्या कुठल्याशा प्रोफेसराचं झालं तशी गत व्हायची आपली! त्यानं आपल्याला बनवता कामा नये. आपणच त्याला बनवू या!"

शेवटी त्याना काहीतरी सुचलं. त्यानी एक गाढव विकत आणलं; आणि टिल्लू ज्या खाणावळीत उतरला होता तिथं त्याला ढकलीत ओढीत नेलं.

"या गाढवाला वाचायला शिकवशील?" त्यानी प्रश्न केला.

"शिकवीन!" टिल्लूनं लगेच उत्तर दिलं. "पण तुम्हाला माहीत आहेच की गाढवाला अक्कल बेताचीच असते. तेव्हां वेळ थोडा जास्त लागेल."

“ म्हणजे किती ?” प्रमुखांनी विचारले.

“ वीस वर्षं !” टिल्लू म्हणाला. ‘ वीस वर्षं थोडीथोडकी नाहीत ’ त्यानं मनाशी म्हटलं. ‘ तेवढ्या काळात हा बुड्ढा कदाचित मरूनही जाईल. किंवा कदाचित् मीच मरेन किंवा गाढव मरेल. कुणी मेलं तरी हा प्रश्न मिटेल. ’

प्रमुख म्हणाले, “ ठीक आहे. वीस वर्षं तर वीस वर्षं. ”


टिल्लूनं शिकवणीचे पैसे म्हणून पाचशे चांदीची नाणी मागितली. त्यातले कांही पैसे त्यानी त्याला आगाऊ दिले; आणि त्याचा चार पायांचा विद्यार्थी त्याच्या ताब्यात देऊन ते निघून गेले.

टिल्लूनं गाढव तबेल्यात ठेवलं. त्याच्या पुढ्यात जी गवताची गव्हाणी होती तीत त्यानं एक जुना जाडजूड ग्रंथ उभा करून ठेवला आणि तो उघडून त्यातल्या सुरवातीच्या पानांमध्ये त्यानं काही धान्याचे दाणे घातले.

जमलं ! ते दाणे खाण्यासाठी गाढव जिभली काढून एकेक पान उलटू लागलं. दाणे संपले, आता आणखी काही मिळत नाही असं पाहून त्यानं भला मोठा आ वासला अन् खिंकाळायला सुरवात केली. “ ई–ओ ! ई–ओ !” टिल्लूनं आनंदानं उडी मारली. त्यानं पुन्हा पुस्तकात दाणे घातले. गाढवानं पुन्हा तोच प्रकार केला.

एक आठवडा निघून गेला. टिल्लू कॉलेज प्रमुखांकडे गेला अन् म्हणाला, “ साहेब, एकदा घरी डोकावता का ? माझा विद्यार्थी कसा शिकतोय ते पाहा ! ”


Trier



" जरूर–जरूर !" साहेब म्हणाले. " पण झालंय का त्याचं काही शिकून ?"

" काही अक्षरं शिकलाय " टिल्लूनं ऐटीत सांगितलं. " मला वाटतं, आठ दिवसांत गाढव एवढं शिकतो म्हणजे खूपच झालं !"

त्याच दिवशी दुपारी साहेब टिल्लूच्या खाणावळीत गेले. त्यांच्याबरोबर प्रोफेसरांचा नि विद्यार्थ्यांचा घोळका पण गेला. टिल्लूनं त्यांना तबेल्यात नेलं. मग गव्हाणीत त्यानं एक पुस्तक ठेवलं. त्या दिवशी गाढवाला खायलाच दिलेलं नव्हतं त्याला सपाटून भूक लागली होती. त्यामुळं दाणे खाण्यासाठी त्यानं भराभर पानं उलटली. पण आज टिल्लूनं पुस्तकात दाणे घातलेले नव्हते. त्यामुळे दर वेळी पान उलटलं की गाढव " ई–ओ !" करून ओरडू लागे.

" पाहिलंत ? " टिल्लू म्हणाला. " ई आणि ओ पर्यंत झालं त्याचं शिकून. उद्यापासून मी त्याला ए नि आय् अक्षरं शिकवणार आहे. "

ते लोक भडकले; आणि रागानं हातपाय आपटीत निघून गेले. टिल्लूनं गाढवाला तबेल्यातून बाहेर काढलं आणि त्यांच्या मागं पिटाळलं. " जा ! " तो ओरडला. " एरफुर्टची दुसरी गाढवं आलेली आहेत, त्यांच्याबरोबर जा ! "

मग आपलं चंबूगवाळं घेऊन त्याच दिवशी त्यानं ते शहर सोडलं.




# टिल्लूचं शिंप्यांपुढं व्याख्यान

टिल्लू रॉष्टोक शहरी राहात होता तेव्हाची गोष्ट. एकदा त्यानं आसपासच्या एकूण एक गावाना पत्रं धाडली. अमुक दिवशी तिथल्या शिंप्यांनी रॉष्टोकला जमावं अशी त्यानं विनंती केली होती. " तुमच्या धंद्यातली एक युगुत तुम्हाला दाखवतो. तुम्हालाच काय, पण तुमच्या पोरांबाळांनाही ती उपयोगी पडेल " असं त्यानं लिहिलं होतं.

आणि खरोखरीच त्या नेमलेल्या दिवशी हजारो शिंपी रॉष्टोकला जमा झाले. टिल्लूनं त्यांना शहराबाहेरच्या एका हिरव्यागार मैदानात नेलं. तिथं मंडळी हिरवळीवर बसली. पहिल्यानं खाणं पिणं झालं; कारण खूपच लांबून पाहुणे थकून भागून आले होते. फराळ झाल्यावर त्यांनी टिल्लूला विनंती केली की, " आता आपण आम्हाला जी युगुत सांगणार आहा ती सांगावी. "

टिल्लू उठला आणि म्हणाला, " माझ्या शिवणकलापटू मित्रांनो ! तुमच्या मनावर मला गोष्ट ठसवायची आहे. ती ही की आपल्या या प्रतिष्ठित धंद्यात पाच वस्तू अत्यावश्यक—कात्री, कपडा, अंगुस्तान, सुई नि दोरा. बस्स् ! दुसऱ्या कश्शाची गरज नाही. सुईत दोरा ओवायचा असतो आणि ओवल्यावर गाठ मारायची असते एवढं मात्र कधी विसरू नका ! नाहीतर कधी कधी बिनखुताचे टाके पडतात. झालं. कुणाला काही प्रश्न विचारायचे आहेत ? "



शिंपी बावळटासारखे एकमेकांकडे पाहू लागले. त्यानी तोंडं वाकडी केली मग एकजण उठून म्हणाला, " तुम्ही तरी कमाल केलीत ! आम्ही एवढी पायपीट करून रॉष्टोकला आलो ते हे ऐकायला की काय ? आम्हाला हे गेली हजार वर्षं माहीत आहे ! "

" हजार वर्षं ? " टिल्लू आ करून त्याच्याकडे पाहात म्हणाला. " तुमचं वय किती ? "

" पंचेचाळीस. "

" मग हजार वर्षं कसं माहीत तुम्हाला ? " आणि त्यानं सर्व मंडळीकडं अशा खिन्न नजरेनं पाहिलं की जणू या खोटारडे-पणाचं त्याला भारी दुःख वाटत होतं !

" बरं–बरं ! " तो म्हणाला. " मला फार वाटत होतं की तुमच्या उपयोगी पडावं. पण मी जे बोलतो ते तुम्हाला आवडत नसेल तर राहिलं ! जा तुम्ही आपापल्या घरी. "

हे ऐकून सगळे शिंपी संतापून उठले; आणि त्याला शिव्या देऊ लागले. टिल्लूला त्यांनी झोडपूनच काढलं असतं. पण तो सापडेल तर ना ? तो जो पळाला तो दोन दारांच्या एका घरांत. पुढच्या दारानं आत शिरला अन् मागच्या दारानं बाहेर पडला. ' टि ' म्हणायच्या आत टिल्लू पसार ! शिंपी आपले शोध शोध शोधताहेत; पण टिल्लूचा पत्ता नाही.

शिंप्यांचा राग त्यांच्या पोटातच काय, पण पोशाखातही मावेना. रॉष्टोक शहरातले शिंपी मात्र हसले. " आम्ही केव्हाच ओळखलं होतं " ते म्हणाले की, " या चोराचा यात काहीतरी डाव आहे ! त्या मूर्खाच्या नादी लागून इतक्या लांब तंगड्या तोडीत येणारे तुम्ही महामूर्खच म्हणायचे ! "

आणि मग रॉष्टोकचे शिंपी नि बाहेरगावचे शिंपी यांच्यात कडाक्याचं भांडण सुरू झालं. पण त्या भांडणाचं मूळ जो टिल्लू तो केव्हाच दिसेनासा झाला होता.

# शिंपी उडले शिवता शिवता

ब्रान्डन्बुर्ग हे एक छोटंसं शहर. तिथं टिल्लू पंधरा दिवस होता. आलेगेले प्रवासी जिथं उतरत अशा एका स्वस्त खाणावळीत तो राहिला. खाणावळ अगदी बाजारपेठेत होती आणि जेवणही महाग नव्हतं. शेजारच्याच घरात एक प्रसिद्ध शिंपी राहात असे.

शिंप्याच्या हाताखाली तीन मदतनीस होते. हवा झकास असली की ते दुकानात बसत नसत. बाहेरच चार खुंटावर एक फळा टाकून त्यावर ते बसत. रोज सकाळी ते खुंट नि फळा बाहेर आणीत. आणि भारतीय लोकांसारखे मांडा ठोकून बसत. विजारी, जाकिटं, कोट काय काय कपडे ते शिवीत.

टिल्लू त्यांच्यापुढून गेला की ते दात ओठ चावीत. त्यांना बहुतकरून तो डोळ्यांसमोर नको असे—कारण तो कधी काम करायचा नाही, नुसताच भटकायचा. आणि दुसरं असं की त्याच्या अंगावर सारखा तो विदुषकी पोशाख असायचा. " जरा सभ्य कपडे शिवून द्या " म्हणून त्यानं यांना कधी ऑर्डर दिली नाहीं. याचाही त्यांना राग होता.

तिघेही शिंपी टिल्लूकडं पाहून शिव्या मारीत; त्याच्या अंगावर चिंध्या फेकीत. इतकंच नाही तर जीभ काढून त्याला वेडावत.

एका रात्री टिल्लू हळूच शिंप्याच्या घरात शिरला. तिथले खुंट त्यानं करवतीनं चिरून पोचट केले अन् तो पळाला.



सकाळीं बाजारचा दिवस म्हणून चौकात गर्दी झाली. तिघा शिंप्यांनी नेहमीप्रमाणें खुंट आणून उभे केले आणि त्यांच्यावर फळा टाकला. मग बसले नेहमीसारखे मांडा ठोकून, शीव शीव शिवत. शिवून शिवून त्यांच्या हातातल्या सुयादेखील तापल्या.

काही वेळ ठीक चाललं होतं. मग काय झालं—डुकरवाला आला शिंग फुकीत. त्याचं काम हे की रोज गाववाल्यांची डुकरं चरायला न्यायची. शिंगाचा आवाज ऐकताच प्रत्येक घरातली डुकरं बाहेर आली. शिंप्यांची डुकरं पण डुलत डुलत बाहेर आली. नेहमीप्रमाणं त्यांनी खाटेच्या खुंटांना अंगं घासली.—' झालं ! लगेच एक चमत्कार झाला. खाटेच्या खुंटांच्या आधीच चिरफळ्या झाल्या होत्या. त्या आता कचकन् मोडल्या आणि खाट जमिनीवर आपटली. त्या धक्क्यानं तिन्ही शिंपी उडाले; आणि रस्त्यातल्या गर्दीत आदळले. लोक दचकले. कुणीतरी ओरडा केला, " धावा, धावा ! शिंपी वाऱ्यावर उडाले ! "

हा ओरडा कुणी केला असेल ते तुम्ही ओळखलं असणारच. त्या बिचाऱ्या तीन शिंप्यांनाही ते आता कळून चुकलं.

त्यानंतर जोवर टिल्लूचा मुक्काम ब्रान्डन्बुर्ग शहरात होता तोवर हे तीन शिंपी घराबाहेर पडायला धजलेच नाहीत. दुकानात उकाडा खूप. अंगावरून घामाचे ओघळ वहात; ते पुशीत ते मुकाट्यानं आत बसत. आणि शीव शीव शिवत.

शेवटी जेव्हा टिल्लू आपला बिस्तरा घेऊन शहर सोडून गेला असं त्यांना कळलं तेव्हां त्यांना हायसं वाटलं.

# फरवाल्यांची फे फे !

टिल्लू एकदा लायूपत्सिग शहरात गेला. लायूपत्सिगचे फरवाले प्रसिद्ध आहेत. फर म्हणजे मऊ मऊ लोकर. काही प्राण्यांची लोकर फार मऊ असते. तिचे छान गळपट्टे नि आंगरखे शिवतात. त्यांची खूप किंमत येते. अशा एखाद्या फरवाल्याकडं काम धरावं म्हणून टिल्लू आला. पण कुणीही त्याला काम दिलं नाही.

बर्लिनच्या एका फरवाल्याला टिल्लूनं कसं गंडवलं याची बातमी त्यांच्या कानावर आली होती. टिल्लू म्हणे त्याच्याकडे कामाला होता. लांडग्यांची एक डझन सुरेख कातडी आलेली होती. ती फाडून यानं त्यांचे तुकडे तुकडे केले आणि त्यांत पेंढा भरून त्यांची छोटी खेळणी केली—लांडगे नि अस्वलं !

लायूपत्सिगच्या फरवाल्यांना भीती पडली की आपल्याजवळच्या महागड्या कातड्यांची हा अशीच नासाडी करील. त्यामुळं कुणीच त्याला काम देईना. तेव्हा टिल्लूनं ठरवलं की याचं उट्टं काढू या !

लवकरच त्याला एक संधी मिळाली.

लायूपत्सिगमध्ये उत्सव होणार होता. उत्सवाच्या रात्री सशाच्या मटणाची मेजवानी होणार होती. टिल्लूनं काय केलं—खाणावळवाल्याचं एक गुबगुबीत सुंदर मांजर होतं. ते त्यानं उचललं. सैपाकघरात सशांची कत्तल चालली होती. तिथून त्यानं एक



सशाचं कातडं घेतलं. माडीवरच्या आपल्या खोलीत जाऊन त्यानं ते कातडं मांजराच्या अंगाभोवती गुंडाळलं. मांजरानं धडपड केली, ओचकारलं; पण त्याची पर्वा न करता टिल्लूनं कातडं शिवून टाकलं. मग त्याच्या नाकाखाली एक मिशी डकवली. स्वतः शेतकऱ्याचा पोशाख केला. आणि तो नगरपालिकेच्या हॉलसमोर उभा राहिला.

थोड्या वेळानं फरवाल्यांपैकी एकजण तिथून चालला होता त्याला हातातला प्राणी दाखवून टिल्लू म्हणाला, "हवाय हा छान छान ससा?"

फरवाल्याच्या डोक्यात रात्रीच्या जेवणाचे विचार घोळत होते. त्याला वाटलं—घ्यावा ससा; उपयोगी पडेल. त्यानं टिल्लूला पैसे दिले; त्याच्या हातातल्या प्राण्याचे कान पकडले आणि गेला घेऊन त्याला खाणावळीत. दुसऱ्या फरवाल्याना त्यानं तो ससा दाखवला. "फारच छान आहे!" असं म्हणून त्यांनी त्याची स्तुती केली.

आता सैपाकासाठी तो सोलण्यापूर्वी सहज गंमत करावी म्हणून एका फरवाल्यानं त्याला बागेत सोडलं आणि आपल्या कुत्र्याला 'छू' केलें, कुत्रा त्याच्या मागं लागला, तशी तो खोटा ससा पटकन् भिंतीवर चढला आणि तिथून "म्यॉंव म्यॉंव" करू लागला.

ससा—आणि "म्यॉंव म्यॉंव" करतो?

लोक थक्क झाले आणि मग लवकरच त्याना कळून चुकलं की त्या शेतकऱ्यानं आपल्याला फसवलं. ससा म्हणून मांजर गळ्यात बांधलं! मांजराचं मांस कुणी खातात थोडंच?

त्या शेतकऱ्याला चांगली शिक्षा करावी म्हणून ते रागारागानं त्याचा शोध करू लागले. पण तो थोडाच सापडतो ? टिल्लू केव्हाच कपडे बदलून नेहमीचा विदूषक झाला होता. त्याची कुणाला शंकाही आली नाही.

आणि पुन्हा लोकांच्या खोड्या काढायला टिल्लू मोकळा झाला !

नोंद दि.
क्रमांक



# ब्रेमन शहरात दूधच दूध

ब्रेमन शहरात आठवड्याचा बाजार भरला होता तेव्हां टिल्लू अचानक तिथं आला. नुसता नाही – दोन्ही हातांनी एक प्रचंड पिंप लोटीत लोटीत.

त्यानं ते पिंप बाजारपेठेत उभं करून ठेवलं. आणि मग त्यानं दौंडी पिटली – " शेतकरी भगिनीनो, तुम्ही जेवढं म्हणून दूध आणलं असेल तेवढं या पिंपात ओता. मी सगळं दूध विकत घ्यायला तयार आहे. "

दूधवाल्या बायाना वाटलं, आपलं काम सोपं झालं ! त्यांनी भराभरा सर्व दूध पिंपात ओतलं. टिल्लू जवळ उभा होता. कुणी किती मापं दूध घातलं ते तो पिंपाच्या बाहेरच्या बाजूवर खडूनं लिहीत होता. शेवटी बाजारात कुठंही दूध म्हणून उरलं नाही. सारं सारं दूध पडलं त्या एका पिंपात ! पिंपाची आतली बाजू दुधानं भरली आणि बाहेरची बाजू अक्षरानी नि आकड्यानी भरली.

एव्हाना चौकात खूप गर्दी जमली होती. प्रत्येकाला नवल वाटत होतं—हा माणूस एवढ्या दुधाचं करणार तरी काय ? पण हे नवल काहीच नव्हतं. याहून मोठं नवल त्यांना दिसणार होतं.

कारण पिंप पुरतं भरल्यावर दूधवाल्या बाया पैसे मागू लागल्या. तेव्हां टिल्लू म्हणाला, " आत्ता माझ्याजवळ पैसे नाहीत. पण पंधरा दिवसांत मी पुन्हा ब्रेमनध्ये येणार आहे तेव्हां तुमचं सर्वांचं देणं देऊन टाकीन ! "

हे ऐकल्यावर दूधवाल्या बाया काय गप्प बसतील ? त्यांनी त्याला शिव्या द्यायला सुरवात केली. आणि मग जोराचं भांडण सुरू झालं.

" माकडतोंड्या ! आधी पैसे टाकतोस की देऊ पोलिसात ? " त्या ओरडल्या.

" मला हे कळत नाही–" टिल्लू दुखावलेल्या आवाजात म्हणाला, " की तुम्ही अशा कातावता का ? मी तुम्हाला खरं ते सांगितलं. पंधरा दिवस थांबायची जिची तयारी नसेल त्या बाईनं पिंपातून आपला दुधाचा वाटा काढून घ्यावा ! पण जेवढं माप टाकलं असेल तेवढंच, बरं का ? एक थेंबही जास्ती घ्यायचा नाही ! "

पुन्हा आरडा ओरडा, गडबड, मारामारी ! एवढा जबरदस्त कल्लोळ उडाला, की जवळ नगरपालिकेचा हॉल होता त्याच्या तीन खिडक्यांची तावदानं फुटली. दूधवाल्या बायानी पिंपावर झडप घातली. पाहता पाहता दुधाची कारंजी उडाली. त्यांत बाया न्हाऊन निघाल्या. थोड्याच वेळात पिंप कलंडलं आणि बाजारपेठेत दुधाचे पाट वाहू लागले. चौकात ठिकठिकाणी दुधाची डबकी साचली. जसा काही ब्रेमन् गावात दुधाचा पाऊस पडला होता !

आणि मग त्या चिडलेल्या दूधवाल्या एकमेकींच्या झिंज्या उपटू लागल्या. पाहणारांची हसून हसून पोटं दुखू लागली.

आणि टिल्लूचं काय ?

हं ! ते सांगायला का हवं ? टिल्लूला तुम्ही आता चांगला ओळखता. काहीतरी कळ लावून द्यायची एवढंच त्याचं काम असे. त्याचा शोध सुरू झाला की तो जागेवर नसायचाच.



टिल्लूची स्वारी पुन्हा भटकत निघाली. डोंगर खोरी त्यानं पायांखाली घातली; नद्या ओलांडल्या; जंगलं नि शेतं तुडवली. शेवटी तो अशा एका ठिकाणी आला की जिथं कुणालाच त्याची खरी माहिती नव्हती.

आणि मग फुकट गेलेल्या वेळाची त्यानं भरपाई केली. पुन्हा काहीतरी मौज केली. पुन्हा आपला पसार ! गावकरी नवल करताहेत—यानं असं कसं बनवलं? अगदीच कसे आपण बावळट?

अगदी म्हातारा होईपर्यंत टिल्लूचे हे चाळे चालू होते. दर वेळेस नवा गाव – नवं शहर ! यानं सापळा लावून ठेवावा आणि त्यात कुणीतरी वेडबंबू सापडावेत असा प्रकार शेवटपर्यंत चालू होता.

त्याचं कारण असं की जगात वेड्या लोकांची वाण नाही. पूर्वी नव्हती, आजही नाही. आणि वेडे आहेत म्हणून लुच्च्यांचं फावतं.

तुम्हाला ती म्हण माहीत आहेना – दुनिया झुकती है, झुकानेवाला चाहिये !



मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. वाचनालय शाखा
अनुक्रम ७२८८९ वि. वा. दा.
क्रमांक ३४७५ नोंद दि ९।११।८०

म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय शाखा.
वा. क्र. 93244 नों. दि ..............
वि. ...कादंबरी... क्र. ..................

IRBK-0113255